'हर घर तिरंगा' अभियानात चंद्रपूर जिल्हा पुन्हा राज्यात अग्रेसर ठरवूया - आ. सुधीर मुनगंटीवार

९ ते १७ ऑगस्टदरम्यान प्रत्येक घरावर तिरंगा फडकविण्याचा निर्धार; जिल्हाधिकाऱ्यांना नियोजनाबाबत आ. मुनगंटीवार यांचे पत्र

एक लाख तिरंगा ध्वज उपलब्ध करून जिल्हाभर वितरणाच्या सूचना

राष्ट्राभिमानाचे प्रतीक असलेला तिरंगा प्रत्येक घरावर अभिमानाने फडकवूया; आ. सुधीर मुनगंटीवार यांचे जिल्हावासीयांना आवाहन

चंद्रपूर : देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'हर घर तिरंगा' अभियानाला यंदाही चंद्रपूर जिल्ह्यात अभूतपूर्व यश मिळावे, या उद्देशाने राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकारी यांना पत्र पाठविले आहे. ९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानासाठी एक लाख तिरंगा ध्वज उपलब्ध करून त्यांचे जिल्हाभर नियोजनबद्ध वितरण करण्यात यावे, जेणेकरून प्रत्येक घरावर अभिमानाने राष्ट्रध्वज फडकावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. तसेच चंद्रपूर जिल्ह्याने यापूर्वीप्रमाणेच यंदाही 'हर घर तिरंगा' अभियानात राज्यात अग्रस्थानी राहून राष्ट्रभक्तीचा नवा आदर्श निर्माण करावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

पत्रात आ. मुनगंटीवार यांनी नमूद केले आहे की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या 'हर घर तिरंगा' अभियानाला देशभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गेल्या काही वर्षांपासून चंद्रपूर जिल्हा या अभियानात राज्यात अग्रस्थानी राहिला असून, यंदाही हा मान कायम राखण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच व्यापक नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी एक लाख तिरंगा ध्वज उपलब्ध करून ते नागरिकांना प्रत्येकी २५ रुपयांच्या दराने उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी, अशी सूचना त्यांनी केली आहे. तसेच ९ ते १७ ऑगस्ट या अभियान कालावधीत प्रत्येक घरापर्यंत तिरंगा पोहोचेल, यासाठी प्रभावी नियोजन व जनजागृती करण्यात यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

चंद्रपूर जिल्हा राष्ट्रभक्ती, जनसहभाग आणि संघटित प्रयत्नांच्या बळावर यंदाही 'हर घर तिरंगा' अभियानात राज्यात अग्रेसर राहील, असा विश्वास व्यक्त करत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सर्व जिल्हावासीयांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत प्रत्येक घरावर अभिमानाने राष्ट्रध्वज फडकवून राष्ट्रप्रेमाचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन केले आहे.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 6764 / ऑगस्ट / 2026 दिनांक : 05.08.2026

प्रति,

मा. जिल्हाधिकारी
चंद्रपूर

सप्रेम नमस्कार,

विषय : हर घर तिरंगा अभियानांतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात स्वातंत्र्यदिनापूर्वी 1 लाख तिरंगा ध्वजांचे वितरण करण्यासाठी आवश्यक नियोजन व कार्यवाही करण्याबाबत.

महोदय,

देशाचे मा. पंतप्रधान महोदयांनी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्याने प्रत्येक घरामध्ये देशभक्ती पोहोचावी या उद्देशाने हर घर तिरंगा मोहीम सुरू केली आहे. मागील काही वर्षापासून चंद्रपूर जिल्हयात ही मोहीम सुरू असून या मोहिमेमध्ये चंद्रपूर जिल्हा हा नेहमी अग्रेसर राहिलेला आहे. यावर्षी सुध्दा हर घर तिरंगा मोहीमेअंतर्गत स्वातंत्र्य दिनापर्यंत 1 लक्ष घरी तिरंगा पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवावे. त्यासाठी डाक विभागाच्या माध्यमातून 1 लक्ष पवित्र तिरंगा ध्वज हा प्रत्येकी 25 रूपये प्रमाणे विकत घेऊन जिल्हाभर वितरण करण्याची व्यवस्था करण्यात यावे. या संदर्भात समाज माध्यम व इतर प्रसिध्दी माध्यमांच्या बाबतीतही नियोजन करण्यात यावे, ही विनंती.

कार्यवाहीची रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

योग्य सहकार्याची अपेक्षा

सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

मा. अधिक्षक, मुख्य पोस्ट ऑफिस, चंद्रपूर

।। वृक्ष लावा, वृक्ष जगवा ।।

पत्ता : 'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र. 07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)